लोकशाही दिनाची अंमलबजावणी
जिल्हा पालक सचिवांची नेमणूक.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : प्रसुधा-१०९९/सीआर-३५/९९/१८-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ डिसेंबर, १९९९.

शासन निर्णय :-

शासनाच्या वारंवार निदर्शनास आले आहे की, जी कामे वास्तविक क्षेत्रिय कार्यालयाकडून होणे आवश्यक असते अशा कामांसाठीसुध्दा नागरिकांना मंत्रालयाकडे धाव घ्यावी लागते. वास्तविक यापैकी ब-याचशा अर्जावर निवेदनांवर आवश्यक ती कार्यवाही संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडूनच होणे अपेक्षित व आवश्यक असते. संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडून कार्यवाही न झाल्यास अथवा त्यात दिरंगाई झाल्यास मंत्रालयीन विभागाला हस्तक्षेप करावा लागतो. आणि मग नागरिकांच्या अर्जावर व निवेदनांवर क्षेत्रिय अधिका-यांकडून अहवाल मागविण्यात येतात व ते वेळेवर प्राप्त न झाल्यास त्या-साठी मंत्रालयीन विभागांना पाठपुरावा करावा लागतो. प्राप्त झालेला अहवाल परिपूर्ण नसल्यास शासनास निर्णय घेता येत नाही व त्यामुळे अर्जदारांना योग्य तो न्याय देता येत नाही.

या सर्व प्रक्रियेत मंत्रालयीन विभागांच्या अधिका-यांचा व कर्मचा-यांचाही बराच वेळ खर्च होतो व त्यामुळे त्यांना त्यांच्या मूलभूत कामासाठी म्हणजेच धोरणात्मक निर्णयासाठी पूर्ण वेळ देता येत नाही.

जी कामे क्षेत्रिय कार्यालयाकडूनच होणे आवश्यक आहे, अशा कामांसाठी नागरि-कांकडून आलेल्या अर्जावर व निवेदनांवर त्वरित न्याय मिळावा या दृष्टीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन पाळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लोकशाहीदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित जिल्ह्यातील प्रमुख अधि-का-यांनी उपस्थित राहून नागरिकांची निवेदने स्विकारावीत व एक महिन्याचे आत अर्जदारांना अंतिम उत्तर द्यावे, असे ठरवून देण्यात आले आहे. अशा प्रकारे लोकशाही दिन पाळल्यास नागरिकांचे स्थानिक पातळीवरील प्रश्न ब-याच प्रमाणात सोडविले जातील असा शासनास विश्वास वाटतो.

या कामास जिल्हा पातळीवरील अधिका-यांना योग्य ते मार्गदर्शन देऊन त्यांच्या-मार्फत नागरिकांना स्थानिक पातळीवरच न्याय मिळवून देण्यासाठी अधिक उपाययोजना करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

अ] मंत्रालयीन विभागांमध्ये जिल्हा पातळीवरील कामाकरिता जे अर्ज/तक्रारी/निवेदने मंत्रालयात प्राप्त होतात असे सर्व अर्ज/निवेदने पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागांनी त्या त्या जिल्हाधिका-यांकडे पाठवावी.

ब] जिल्हाधिका-यांकडे अशी निवेदने पाठविण्यापूर्वी प्रशासकीय विभागांनी संबंधित अर्जदाराला तात्काळ पोच द्यावी. पोचपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

क] प्रत्येक विभागाने त्या त्या आठवडयात गुरुवारपर्यन्त प्राप्त झालेली निवेदने शुक्रवारी अगर कार्यालय सुरु असलेल्या शनिवारी संबंधित जिल्हाधिका-यांकडे पाठवावी.

ड] जिल्हाधिका-यांनी या निवेदनाकरिता स्वतंत्र नोंदणी संगणकाद्वारे ठेवावी.

इ] जिल्हाधिका-यांनी लोकशाही दिनांच्या पूर्वीच्या आठवडयापर्यन्त प्राप्त झालेली निवेदने संबंधित क्षेत्रिय अधिका-यांकडे पाठवून लोकशाही दिनी त्यांना सदर निवेदनांच्या अहवालासह जिल्हाधिकारी कार्यालयात हजर राहण्यास सांगावे.

२] लोकशाही दिनी झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरिता संबंधित जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी लोकशाही दिनाच्याआठवडयात जिल्हयाला भेट देवून पुढील बाबींचा आढावा घ्यावा.

अ] लोकशाही दिनी प्राप्त झालेल्या निवेदनांवरील कार्यवाही.

ब] मंत्रालयीन विभागांकडून वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयांकडे पाठविलेल्या निवेदनांवरील कार्यवाही.

क] जी महत्वाची प्रकरणे मंत्रालयाच्या आदेशाअभावी जिल्हा पातळीवर प्रलंबित आहेत अशा प्रकरणांचा पाठपुरावा संबंधित मंत्रालयीन विभागांच्या ध्येयधोरणानुसार नियमांच्या चौकटीत राहूनच उपरोक्त निवेदनांवर कार्यवाही करावी. आवश्यकता वाटल्यास निर्णय घेण्यापूर्वी संबंधित मंत्रालयीन विभागाचे मार्गदर्शन ~~करू~~ घ्यावे.

३] सर्व विभागांच्या निरनिराळया प्रकरणांकरिता पालकमंत्र्यांना जिल्हा स्तरावरील संबंधित विभागाचे अधिकारी मदत करतील. मंत्रालय स्तरावरील मदत म्हणून पालकमंत्र्यांप्रमाणे निरनिराळया विभागाच्या सचिवांपैकी एकास प्रत्येक जिल्हयाकरिता पालक सचिव म्हणून घोषित करण्यात येईल. सदर सचिव पालक मंत्र्यांसोबत जिल्हयाला भेट देतील व उपरोक्त सर्व कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पालक मंत्र्यांना मदत करतील. तसेच जिल्हयापुरत्या निरनिराळया विभागाचा कामाचा पाठपुरावा मंत्रालयात सचिव स्तरावर करतील.

४] जिल्ह्यातील निरनिराळ्या विभागांचा प्रस्ताव अनेक वेळा मंत्रालय स्तरावर फार काळ प्रलंबित असतो. अशा प्रस्तावांचा पाठपुरावा सुध्दा संबंधित पालक सचिव जिल्ह्याच्या वतीने मंत्रालयात करतील.

५] प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी शक्यतो पालक मंत्र्यांशी चर्चा करून भेटीचा दिवस नक्की करून द्यावा.

६] प्रत्येक पालक सचिव दर महिन्यास माझ्याकडे खालील २ बाबींवर अहवाल सादर करतील :-

अ] ज्या प्रकरणात स्थानिक स्तरावर हेतुपुरस्सर विलंब करण्यात आला होता, त्या प्रकरणांची माहिती तसेच विलंबासाठी जबाबदार व्यक्तींवर कार्यवाहीचा प्रस्ताव.

ब] स्थानिक स्तरावंर वारंवार निर्माण होणारे प्रश्न, ज्यासाठी स्थानिक स्तरावरच राज्य शासनाच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे.

* पालक सचिवांची नावे सोबत जोडली आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

* यादी प्राप्त झाली नाही.

सही/-

[ अ. ल. बोंगिरवार ]

शासनाचे मुख्य सचिव.

## परिशिष्ट–१

### पालक सचिवांनी सामान्य प्रशासन विभाग[१८–अ] कडे दरमहा पाठवावयाच्या अहवालाचा नमूना

जिल्हयाचे नांव :

पालक सचिवाचे नांव :

माहे: चा अहवाल.

| दिनांक च्या लोकशाही दिनापूर्वी प्रलंबित अर्ज,तक्रारी व निवेदने यांची एकूण संख्या | त्यानंतर चालू महिन्यातील लोकशाही दिनापर्यंत प्राप्त झालेल्या अर्ज तक्रारी व निवेदने यांची एकूण संख्या. | | १+२+३ | चालू महिन्यातील लोकशाही दिनी अंतिम निर्णय घेऊन निकाली काढलेल्या अर्ज,तक्रारी व निवेदने यांची संख्या | प्रलंबित अर्ज तक्रारी व निवेदने यांची संख्या [४–५] |
|---|---|---|---|---|---|
| | सरळ प्राप्त | मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त. | | | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |

### मंत्रालयीन विभागवार गोषवारा

| विभागाचे नांव | दिनांक च्या लोकशाही दिनापूर्वी प्रलंबित अर्ज, तक्रारी व निवेदने यांची एकूण संख्या | त्यानंतर चालू महिन्यातील लोकशाही दिनापर्यंत प्राप्त झालेल्या अर्ज,तक्रारी व निवेदने यांची एकूण संख्या | | २+३+४ | चालू महिन्यातील लोकशाही दिनी अंतिम निर्णय घेऊन निकाली काढलेल्या अर्ज, तक्रारी व निवेदने यांची संख्या | प्रलंबित अर्ज तक्रारी व निवेदने यांची संख्या [५–६] |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ प्राप्त | मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त | | | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| | | | | | | |